मौजे वर्डी ता. चोपडा,जि.जळगाव या नळ पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु- २०१२/सं.क्र. ७८७/पापु ०९

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मुंबई-४०० ०३२

तारीख: १९ सप्टेंबर, २०१७

वाचा -

१) ग्रामपंचायत वर्डी, ता. चोपडा,जि. जळगाव यांचा ग्रामसभा ठराव क्र २ दि. २७.९.२००७

२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगाव मूळ तांत्रिक मान्यता आदेश क्र ग्रापापुवि/तांशा/तां ३/५१८/२००९ दि. २६.२.२००९

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जळगाव यांचे पत्र क्र ग्रापापुवि/तां ३/ आरआर/३१५/२०१२ दि. २०.९.२०१२

४) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ना व ग्रा यो मंडळ, नाशिक सुधारीत तांत्रिक मान्यता आदेश क्र मजीप्रामं/भानिकना/तांशा/तां.मं/२८५/२०१२ दि. १२.७.२०१२

प्रस्तावना

मौजे वर्डी, ता. चोपडा,जि. जळगाव नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ७३,८४,५८०/- (ढोबळ) किंमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भीय क्र.१ अन्वये प्रशासकीय मान्यता व संदर्भ क्र २ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. तथापि, जलकुंभाच्या जागेत बदल,वितरण व्यवस्थेच्या लांबीत वाढ,दरसूचीतील वाढ व इतर कारणांमुळे योजनेच्या खर्चात रु. ५१,६८,४२०/- इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ना व ग्रा यो मंडळ, नाशिक यांच्या संदर्भ क्र.४ येथील आदेशान्वये प्रस्तुत योजनेच्या रु.१,२५,५३,००० /-(ढोबळ) किंमतीच्या प्रस्तावास सुधारीत तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. परिणामी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्र क्र.३ अन्वये शासनास सादर केला होता. तद्नुषंगाने प्रस्तुत योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

वरील बाब विचारात घेता, मौजे वर्डी, ता. चोपडा,जि. जळगाव या सुधारीत नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. १,२५,५३,००० /- (ढोबळ) (अक्षरी रुपये एक कोटी पंचवीस लक्ष त्रेपन्न हजार फक्त) एवढ्या सुधारीत किंमतीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत नियोजन व वित्त विभागास प्रस्ताविण्यात आले

होते. तथापि,नियोजन व वित्त विभागाने योजनेच्या दरसूचीतील बदलामुळे झालेल्या वाढीवरील ई.टी.पी. चार्जेस रु. २,६०,८४८/- , जुन्या जलकुंभाच्या दुरूस्तीसाठीची प्रस्तावित रक्कम रु. १,४६,६००/- व व्होल्टेज स्टॅबिलायझरसाठीची वाढविलेली रक्कम रु. २,८१,३२१ वगळून रु. ११८.६४/- लक्ष इतक्या किंमतीस मंजूरी प्रदान केली आहे. त्यानुसार मौजे वर्डी, ता. चोपडा,जि. जळगाव पाणी पुरवठा योजनेच्या **रु.११८.६४ /-लक्ष (रु. एक कोटी अठरा लक्ष चौसष्ट हजार फक्त)** इतक्या किंमतीस पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१. या योजनेस सहमती दिलेल्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तसेच सुधारीत तांत्रिक मान्यता देतांना नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. उपरोक्त नमुद सुधारीत किंमतीत योजनेची उर्वरित सर्व कामे जिल्हा परिषद स्तरावरून ६ महिन्यात पूर्ण करावीत.

३. सदर योजना पूर्ण झाल्यावर चाचणी घेतल्यानंतर ती संबंधित ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करून तिचे लेखे बंद करण्यात यावेत.

४. सदर योजना राबविणे, त्याचे परिरक्षण, दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) या साठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी शासनाकडून कोणतीही मदत मिळणार नाही.

५. सन २०१३ मधील CAG च्या अहवालानुसार राज्यातील २१% पाणी पुरवठा योजना या देखाभाल दुरुस्ती अभावी, वीज देयक न भरल्यामुळे (Poor maintenance/nonpayment of electricity of bills) बंद पडल्या असल्याचे दिसून येते. यास्तव सदर योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायतीची/जिल्हा परिषदेची राहील.

६. हागणदारीबाबतच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७. प्रस्तुत योजना कोणत्याही परिस्थितीत पुनर्सुधारीत केली जाणार नाही याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.

८. या योजनेवर होणारा खर्च राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

२. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्य अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र.२०४/१४४३ दि. १६.१२.२०१६ व अनौ. सं क्र २२५/व्यय- ३ दि २९.७.२०१७ अन्वये प्राप्त त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१९१६२५१०२९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vaishali Dattatraya Fulsundar

Digitally signed by Vaishali Dattatraya Fulsundar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=00e21046f4f20f3438928047553b9a3968c8ec5276af8883c74ff066482ba683, serialNumber=035ad3ac42b3cb2d7153eb07ca4987f4c28aa8b52bad8a330512fc5df5d5b426, cn=Vaishali Dattatraya Fulsundar
Date: 2017.09.19 16:14:49 +05'30'

(वै.द.फुलसुंदर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
३) सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
४) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) विभागीय आयुक्त, जळगाव
६) जिल्हाधिकारी, जळगाव
७) संचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पी.एम.टी बिल्डींग स्वारगेट, पुणे
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव
९) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
१०) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
११) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
१२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगाव.
१३) कक्ष अधिकारी (कार्या १४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) कक्ष अधिकारी (व्यय-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) कार्यासने (पापु-०४, १० व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
१६) निवडनस्ती कार्यासन पापु-०९.